निविदा सुचना

जिल्हा व अति. सत्र न्यायालय, गंगापूर, ता. गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. /लेखा/डि—६/९६९६/२०२६ दि.०४/११/२०२६ मध्ये नमुद केल्यानुसार जिल्हा व अति. सत्र न्यायालय, गंगापूर तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,कनिष्ठ स्तर, गंगापूर या आस्थापनेवरील कार्यालयीन व नक्कल विभागातील छायांकित प्रती काढण्याचे कामे बाहय यंत्रणेद्वारे खाजगी कंत्राटदारा मार्फत करणेसाठी बंद लिफाफयात निविदा मागविणेबाबत.

जिल्हा व अति. सत्र न्यायालय, गंगापूर तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,कनिष्ठ स्तर, गंगापूर या आस्थापनेवरील कार्यालयीन व नक्कल विभागातील छायांकित प्रती ए—४ कागदावर झेरॉक्सचे काम खाजगी कत्रांटदारामार्फत करुन घेणे कामी खुल्या बाजारपेठेतुन मोहरबंद निविदा / दरपत्रके दिनांक २०/११/२०२६ ते २६/११/२०२६ या कालावधीत मागविण्यात येत आहेत.

निविदाकारांनी कार्यालयाच्या गरजेनुसार नक्कल विभागातील नकलासाठी झेरॉक्सची कामे तात्काळ किंवा विहित मुदतीत करुन देणे तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक २०/०२/२००७ रोजीच्या पत्रासोबत दिलेल्या करारनाम्यात ठरवून दिलेल्या अटी व शर्ती नुसार तसेच कार्यालयात बॅक गॅरंटी, झेरॉक्स मशिन संदर्भातील विमा पॉलिसी कार्यालयात सादर करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील. सदर निविदा सादर करतांना दरपत्रकामध्ये पेपरची साईज व प्रति झेरॉक्सचा दर तसेच जी.एस.टी. क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

मोहदबंद निविदा / दरपत्रके दिनांक २६/११/२०२६ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत जिल्हा व अति. सत्र न्यायालय, गंगापूर जि. औरंगाबाद येथे पोहोचणे आवश्यक आहे. तदनंतर प्राप्त झालेल्या निविदा / दरपत्रके यांचा या प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही. विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या निविदा / दरपत्रके मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येतील.

मा.जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद हे कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्विकारण्याची किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवतील.

जिल्हा व अति. सत्र न्यायाधीश,
गंगापूर

जा.क्र. लेखा/ ९१६ /२०२६
जिल्हा व अति. सत्र न्यायालय, गंगापूर
दि.१९/११/२०२६

प्रत :— १ सुचना फलक, जिल्हा व अति. सत्र न्यायालय, गंगापूर आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापूर, जि. औरंगाबाद.

२ अध्यक्ष, वकिल संघ, गंगापूर, जि. औरंगाबाद.

३. सुचना फलक, तहसिल कार्यालय, गंगापूर, जि. औरंगाबाद.

४. सुचना फलक, मुख्याधिकारी कार्यालय, नगरपरिषद, गंगापूर, जि. औरंगाबाद.

५. मा. जिल्हा न्यायालय, औरंगाबाद यांचे संकेतस्थळ.